**अध्यक्ष महोदय,**

मी आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन सभागृहामध्ये सादर करीत आहे.

करसंकलनाची पध्दत सोपी, सुटसुटीत व व्यवसायभिमुख असावी. मात्र करचुकवेगिरी करणाऱ्यास प्रतिबंध करणारी असावी यावर माझा ठाम विश्वास आहे. करसंकलन पध्दतीत संगणकीकरणाचा वापर करून करदात्यास ई-सेवा देणे, व्यापारातील भांडवल अडकून पडू नये याकरिता व्यापाऱ्यांचा परतावा शीघ्रगतीने देणे या दिशेने सुधारणांची वाटचाल असेल. या पध्दतीमुळे व्यवसायास पोषक असे ‘ Ease of doing business ’ वातावरण तयार होईल व उद्योगवाढीमुळे करसंकलनात ही वाढ होईल. सन २०१४-१५ साठी करसंकलनाचे उद्दिष्ट रुपये एक लाख अठरा हजार सहाशे चाळीस कोटी आहे. मला विश्वास आहे की, कर संकलनाचे उद्दिष्ट गाठण्यात येईल.

वस्तू व सेवा कर.

२. वस्तू व सेवा कर लागू करण्यासाठी घटना दुरुस्ती विधेयक केंद्र शासनाने लोकसभेत मांडले आहे. देशात दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून वस्तू व सेवा कर आकारणी सुरु होणे अपेक्षित आहे. या कर प्रणालीमुळे भारतातील अप्रत्यक्ष कर पध्दतीत अमूलाग्र बदल होणार आहे. वस्तू व सेवा कर पध्दतीचा अवलंब केल्यामुळे भारतात एकसंघ, सुसूत्र बाजारपेठ निर्माण होईल. भारतात तयार होणारी उत्पादने जागतिक पातळीवर स्पर्धात्मक होतील. मला खात्री आहे की, वस्तू व सेवा करामुळे उत्पादन क्षेत्रास चालना मिळून ‘ मेक इन महाराष्ट्र ’ कार्यक्रमास गती येईल. तसेच करदात्याला करसंबंधी नियमांची पूर्तता करणे सुकर होईल. महाराष्ट्र राज्य सुधारणा प्रक्रियेत नेहमीच अग्रेसर राहिले आहे. राज्याने वस्तू व सेवा करास पाठिंबा दिला आहे. राज्याने नवीन करप्रणालीस अपेक्षित असलेल्या कार्यपध्दतीची आखणी करताना मोठी भूमिका बजावली आहे व त्या संदर्भातील अपेक्षित असलेल्या बाबींची पूर्वतयारी प्रगतीपथावर आहे.

संगणकीकरण. ३. संगणकीकृत कर प्रशासन ही आजच्या काळाची गरज आहे. विक्रीकर विभागाचे संगणकीकरण मोठया प्रमाणात करण्यात आले आहे. संगणकीकरणाचे आधुनिकीकरण ही सततची प्रक्रिया आहे. सध्याच्या संगणकीकृत प्रणालीचे आधुनिकीकरण करण्याचा प्रकल्प शासनाने हाती घेतला आहे. नवीन प्रकल्पात वस्तू व सेवा कर कायद्यामध्ये अपेक्षित असलेल्या कार्यप्रणालीशी अनुरुप असे सॉफ्टवेअर बनविण्यात येत आहे, जेणेकरुन मूल्यवर्धित कर कायद्यातील व्यापाऱ्यांच्या माहितीचे संक्रमण वस्तू व सेवा कर प्रणालीत सहजगत्या होऊ शकेल.

चटईक्षेत्राच्या अधिमूल्यात वाढ. ४. सर्व प्रकारच्या विकास व बांधकाम परवानग्या त्वरित देण्यात याव्यात व या माध्यमातून जनतेची सोय व्हावी, तसेच शासनास महसूल मिळावा यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत. राज्यातील मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये शेती अथवा ना-विकास क्षेत्रामध्ये, औद्योगिक तसेच शैक्षणिक वापरासाठी अधिकचा चटई क्षेत्र निर्देशांक रस्ता रुंदीनुसार आणि अधिमुल्य आकारुन जिल्हाधिकारी यांचे स्तरावर अनुज्ञेय करण्याचे धोरण शासनाने स्विकारले आहे. तसेच प्रादेशिक योजनेत रहिवास व इतर वापरासाठी फेरबदल करण्याची कार्यपध्दती अधिक सुलभ करण्यात येत आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेस स्थानिक पातळीवरही या सुविधा सत्वर उपलब्ध होवू शकतील. त्याचप्रमाणे महानगरपालिका अथवा नगरपालिका क्षेत्रामध्ये अधिमुल्य आकारुन वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्याची तरतूद करण्याचा शासनाचा विचार आहे. तसेच बृहन्मुंबई शहरात अधिमूल्य आकारुन अनुज्ञेय असणाऱ्या चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये ०.३३ वरुन ०.६० इतकी वाढ करण्याचा व अधिमुल्याचे दर वाढविण्याचा शासनाचा विचार आहे. सर्व प्रकारच्या वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाचे दर वाढविण्याचाही शासनाचा विचार आहे. अशा प्रकारे वाढ केल्यामुळे व वापरामध्ये बदल केल्यामुळे संबंधित व्यक्तीस बराच फायदा होतो, परंतु शासनास त्याप्रमाणात महसूल उपलब्ध होत नाही. संबंधित व्यक्तींना मिळणाऱ्या फायद्याच्या अनुषंगाने शासनास वाजवी महसूल प्राप्त व्हावा यासाठी या सुधारणा करण्यात येत आहेत. हे करत असतांना शासनाचा वाढीव महसूल हा संबंधितांना प्राप्त होणाऱ्या फायद्यामधूनच मिळावा व सर्वसामान्य जनतेवर याचा भार पडू नये अशी अपेक्षा आहे. सर्व परवानग्या देण्याची पध्दत सोपी करणे, परवानग्या कालमर्यादेत देणे व अधिकच्या फायद्यामधून शासनाने वाजवी अधिमुल्य आकारणे, या माध्यमातून शासनास मोठा निधी प्राप्त होईल, अशी अपेक्षा आहे.

**देशी मद्याच्या उत्पादन शुल्काच्या दरात बदल करणे.**

५. देशी मद्यावरील कररचनेत सन २०१३ मध्ये बदल करण्यात आला होता. त्यामध्ये मी आणखी बदल करत आहे. देशी मद्यावरील उत्पादन शुल्काचा दर हा निर्मिती मूल्याच्या २०० टक्के अथवा रु.१२० प्रति प्रुफ लिटर यापैकी जो जास्त असेल तो राहील.

**मूल्यवर्धित कर कायदयातील सुधारणा.**

६. अध्यक्ष महोदय, मूल्यवर्धित कर कायद्यात मी काही बदल सुचवित आहे.

केंद्र शासन सेवा कराची आकारणी करते. काही व्यवहारांवर विक्रीकर व सेवा कराची आकारणी होते. करावर कर लागू नये म्हणून अशा व्यवहारांमध्ये यापुढे सेवा कर वेगळयाने बिलात वसूल केला असल्यास त्याचा समावेश विक्री व खरेदी किंमतीत होणार नाही.

विक्रीकर विभागातर्फे केल्या जाणाऱ्या व्यवसाय लेखा परिक्षण किंवा अन्वेषण कार्यवाहीत आढळून आलेल्या निष्कर्षांच्या अनुषंगाने व्यापारी सुधारित विवरणपत्र दाखल करु शकतो. सध्या अशाप्रकारे फक्त एकदाच सुधारित विवरणपत्र दाखल करता येते. ही अट शिथिल करण्यात येत असून यापुढे लेखा परिक्षण अथवा अन्वेषणादरम्यान आढळून आलेल्या निष्कर्षानुसार व्यापारी एका पेक्षा जास्त सुधारित विवरणपत्र दाखल करु शकेल.

विवरणपत्र उशीरा दाखल केल्यास विलंब शुल्क लागू होते. यामुळे मागील काही वर्षात विवरणपत्र कसूरदारांचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झालेले आहे. रास्त प्रकरणात काही कारणांमुळे उशीर होवू शकतो. ही बाब लक्षात घेवून विवरणपत्र दाखल करावयाच्या तारखेनंतर एक महिन्याच्या आत विवरणपत्र दाखल केल्यास सध्याच्या रुपये दोन हजार ऐवजी रुपये एक हजार विलंब शुल्क लागेल.

मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत कोणतीही कार्यवाही प्रलंबित असताना व्यापाऱ्याने काही व्यवहारांवर कर भरणा बरोबर केला नाही अशी खात्री झाल्यास व्यवहारनिहाय निर्धारणा कार्यवाही सुरु करता येते. याऐवजी व्यापारी काही व्यवहारांवर कर भरणा योग्यरित्या करत नाही किंवा टाळण्याचा प्रयत्न करत आहे असे सकारण वाटल्यास अशा व्यवहारांची निर्धारणा सुरु करता येईल. तसेच सदर निर्धारणा पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणे व एकतर्फी आदेश झाल्यास तो रद्द करण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत व्यापारी वार्षिक सुधारित विवरणपत्र दाखल करून जादा कराचा भरणा करु शकतो. अशा वेळी अतिरिक्त करावर व्याजाची परिगणना सध्याच्या पध्दतीने न करता ज्या वर्षाचे सुधारित विवरणपत्र आहे त्या वर्षातील १ ऑक्टोबर पासून करावी असे प्रस्तावित करीत आहे. विशिष्ट प्रकरणात सुधारित विवरणपत्राचा कालावधी वर्षापेक्षा कमी असल्यास अशा प्रकरणात व्याज केव्हापासून लागेल याबाबतही सुधारणा करण्यात येईल.

अपीलावर वा पुनर्विलोकनावर निर्णय घेत असताना त्या निर्णयाचा परिणाम जर दुसऱ्या कायदयातील कर दायित्वावर होत असेल व त्या कायद्याखालील प्रकरण संबंधीत प्राधिकाऱ्यासमोर नसेल तर त्याला त्या कायद्यातील तरतूदीनुसार निर्णय घेता यावा यासाठी सध्याच्या तरतूदीमध्ये काही तांत्रिक सुधारणा प्रस्तावित आहेत.

कंपन्यांचे एकत्रीकरण किंवा विभक्तीकरणास उच्च न्यायालय मान्यता देते. उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर संबंधित कंपनीस कंपनी निबंधकाकडे त्यासंबंधी अर्ज करावा लागतो. कंपनी निबंधकाने एकत्रीकरण अथवा विभक्तीकरणाची नोंद घेतल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नवीन नोंदणी दाखल्यासाठी अर्ज करता येईल. सध्याच्या नोंदणी दाखला रद्द करण्याच्या या विषयाच्या तरतूदीमध्ये बदल करण्याचे मी प्रस्तावित करतो.

अध्यक्ष महोदय, मी आता माझे काही करविषयक प्रस्ताव सभागृहापुढे सादर करीत आहे.

प्रवेश कर.

७. राज्याचा वाजवी महसूल संरक्षित व्हावा या उद्देशाने काही वस्तूंवर सध्या प्रवेश कराची आकारणी केली जाते. शेजारील राज्यातून लॉंग स्टील थेट ग्राहकांना विकण्यात येते, असे माझ्या निदर्शनास आणण्यात आले आहे. यामुळे राज्य शासनास त्याच्या वाजवी महसूलास मुकावे लागत आहे. लॉंग स्टीलच्या राज्यात होणाऱ्या उपभोगावर राज्य शासनास वाजवी कर मिळावा म्हणून लॉंग स्टीलवर पाच टक्के प्रवेश कर आकारण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. लॉंग स्टीलवर दुहेरी आकारणी होवू नये याकरिता नियमाप्रमाणे प्रवेश कराची वजावट अनुज्ञेय असेल.

लाकूडविरहित प्लेन आणि प्रीलॅमिनेटेड पार्टीकल बोर्डवरील कर.

८. सध्या लाकूडविरहित प्लेन आणि प्री-लॅमिनेटेड “इको मार्क” चा लोगो असलेल्या पार्टीकल बोर्डवर पाच टक्के कराची आकारणी करण्यात येते. “इको मार्क” चे बोर्ड व इतर प्लायवुड यांच्यामध्ये फारसा फरक नसल्यामुळे सर्व प्रकारच्या प्लेन आणि प्रीलॅमिनेटेड पार्टीकल बोर्डवर साडेबारा टक्के दराने मूल्यावर्धित कराची आकारणी करण्याचे प्रस्तावित करत आहे.

जीवनावश्यक वस्तूंच्या करमाफीस मुदतवाढ.

९. राज्यात काही जीवनावश्यक वस्तू जसे तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ, हळद, मिरची, चिंच, गूळ, नारळ, धणे, मेथी, सुवा, पापड, ओला खजूर, सोलापूरी चादर व टॉवेल्स यांवर दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत सूट देण्यात आली आहे. सदर सूट दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत चालू ठेवण्याचे मी घोषित करीत आहे. बेदाणे व मनुकांवरील कर सवलत देखील दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत सुरु राहील. चहावरील सवलतीचा पाच टक्के कराचा दरही दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत चालू राहील.

महिलांना करात सवलत.

१०. सध्या मासिक रुपये सात हजार पाचशे पेक्षा जास्त वेतन असणाऱ्या सर्वांनाच व्यवसाय कर भरावा लागतो. मी महिलांसाठी व्यवसाय कर आकारणीची वेतन मर्यादा वाढवून रुपये दहा हजार करीत आहे. रुपये दहा हजार पर्यंत मासिक वेतन असणाऱ्या महिलांना यापुढे व्यवसाय कर लागणार नाही. याचा जवळपास एक लाख पन्नास हजार नोकरदार महिलांना लाभ होईल.

मी, महिलांच्या पर्सेस व हॅन्डबॅग्जवरील मूल्यवर्धित कराचा दर साडेबारा टक्क्यांवरुन पाच टक्के करण्याचे प्रस्तावित करतो.

कर्करोगावरील उपचारासाठीची औषधे कर मुक्त.

११. कर्करोगावरील उपचारासाठी काही आवश्यक औषधी करमुक्त करण्याचे मी ठरविले आहे. अशा करमुक्त औषधांची यादी अधिसूचित करण्यात येईल.

गाईड वायरवरील करात सवलत.

१२. वैद्यकीय उपचारादरम्यान आवश्यक गाईडवायर वरील कराचा दर साडेबारा टक्क्यांवरुन पाच टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

एलइडी बल्बवर करात सवलत.

१३. वीजवापर दिवसेंदिवस वाढत आहे. वीजेची बचत करणे ही काळाची गरज आहे. एल.इ.डी. बल्बच्या वापरामुळे वीजबचत मोठया प्रमाणात होते. याचा विचार करुन एल.इ.डी. बल्बवरील कराचा दर साडेबारा टक्क्यावरुन पाच टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

काजू टरफलावरील करात सवलत.

१४. काजूच्या टरफलापासून उत्पादित तेलावर पाच टक्के कर आहे. मात्र काजूच्या टरफलावर साडेबारा टक्के कर लागू होतो. काजूच्या टरफलावरील भरलेल्या कराची संपूर्ण वजावट उत्पादकास उपलब्ध असल्यामुळे त्यास परताव्याकरिता अर्ज करावा लागतो. कच्च्या मालावर उत्पादित मालापेक्षा अधिक कर दर नसावा, याकरिता काजूच्या टरफलावर पाच टक्के दराने कर आकारण्यात येईल.

कर आकारणीतील निश्चितता.

१५. विक्री करण्यात येणाऱ्या वस्तूंवर कर किती टक्के असेल याविषयी संदिग्धता अथवा अनिश्चितता असणे अर्थव्यवस्थेस पोषक ठरत नाही. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये व्यापाऱ्यांच्या बाजूने निर्णय लागला तरी मधल्या काळात व्यापाऱ्यांस अनिश्चिततेस सामोरे जावे लागते व शासनाच्या बाजूने निर्णय लागला तर संबंधित उद्योगावर कर, व्याज व शास्तीचा मोठा बोजा पडतो. अशी संदिग्धता व्यापारामध्ये नसावी. कर आकारणीतील निश्चितता उत्तम करप्रणालीचा अभिन्न भाग आहे. या अनुषंगाने संदिग्धता दूर करण्यासाठी मी काही प्रस्ताव मांडत आहे :—

**(एक) वर्कबुक, आराखडा किंवा चित्रकला वही, प्रयोगशाळा वही, आलेख वही करमुक्त**

सध्या पुस्तके करमाफ असून, वहया, आलेख वही, प्रयोगशाळा वही व आराखडा वहीवर पाच टक्के कर लागतो. परंतु वर्कबुकमध्ये वाचण्यासाठीचा मजकूर देखील असतो व लिहिण्यासाठी मोकळी जागा देखील असते. वर्कबुक पुस्तक आहे की वही आहे की इतर कोणती वस्तू आहे असा वाद निर्धारणेमध्ये झाला आहे व यावर किती कर लागेल असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या संबंधात काही निर्धारणा पूर्ण होवून अपील दाखल झालेली आहेत.

पुढील काळात करनिश्चितता असावी याचा विचार करून वर्कबुक १ एप्रिल, २०१५ पासून करमुक्त करण्यात येईल असे मी घोषित करतो. पूर्वीच्या कालावधीसाठी न्यायालयीन प्रक्रियेत जो निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच वर्कबुक प्रमाणेच आराखडा किंवा चित्रकला वही, प्रयोगशाळा वही, आलेख वही करमुक्त करण्याचे घोषित करतो.

**(दोन) व्हाइट बटरवरील कराचा दर**

मूल्यवर्धित कर कायद्यात देशी लोणी दिनांक १ सप्टेंबर, २००५ पासून चार टक्के व दिनांक १ एप्रिल, २०१० पासून पाच टक्के करास पात्र आहे. व्हाइट बटर वर कराचा दर काय आहे, याविषयी प्रश्न उपस्थित झाला आहे. व्हाइट बटर व देशी लोणी यामध्ये फारसा फरक नाही. या संदर्भात असलेली संदिग्धता दूर करावी म्हणून मी दिनांक १ सप्टेंबर, २००५ पासून व्हाइट बटरवर देखील चार टक्के कर व दिनांक १ एप्रिल,२०१० पासून पाच टक्के कर लागू होईल असे स्पष्ट करतो.

(तीन) कागदावरील कराचा दर

कागदावर सध्या पाच टक्के कर आकारला जातो. सध्याच्या परिशिष्ट " ग " मध्ये कागदासंदर्भातील नोंद ७० (क) " कागद, वर्तमानपत्राचा कागद, पेपर बोर्ड, रद्दी कागद " व ७० (ख) " सर्व प्रकारची कॉम्प्युटर पेपर स्टेशनरी, कार्बन पेपर आणि अमोनिया पेपर "अशी आहे. ७०(क) नोंदीअंतर्गत " कागद " या संज्ञेत कोणकोणत्या वस्तूंचा समावेश होतो, याबद्दल वाद होत आहेत. यात स्पष्टता आणण्यासाठी यापुढे कोणते कागद या नोंदीत असतील हे अधिसूचित करण्यात येईल. पूर्वीच्या नोंदीच्या अनुषंगाने विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही सुरु राहील.

(चार) मसाल्यावरील कराचा दर

मसाल्यावर पाच टक्के कर आहे. मसाल्याची नोंद अशी आहे " मसाले जसे जिरे, हिंग, ॲनीसीड, केशर, मिरी आणि पॉपी सीड्स ". यात वेगवेगळे मसाले मिसळून विकताना सर्वसाधारणपणे ५ टक्के कर भरण्यात आला आहे. अशा मिसळलेल्या तयार मसाल्यांना या नोंदीखाली कर लागेल किंवा नाही याबद्दल संदिग्धता आहे. मिसळलेले मसाले मसालेच असतात म्हणून वेगवेगळया प्रकारचे मसाले एकत्र करुन विकल्यास मसाल्याच्या नोंदीखाली कर लागू होतो असे स्पष्ट करणारी नोंद पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात येईल.

(पाच) कशीदा कामाच्या दोऱ्यावरील कर

कशीदा कामासाठी लागणाऱ्या दोऱ्यावर सर्वसाधारणपणे शिवणकामासाठी लागणाऱ्या दोऱ्याइतकाच कर भरला जात आहे. परंतु, कशीदा कामासाठी लागणाऱ्या दोऱ्याचा समावेश शिवणकामासाठीच्या दोऱ्यात होतो की नाही याबद्दल संदिग्धता निर्माण झाली आहे. कशीदा कामासाठी लागणाऱ्या दोऱ्यावरील कराचा दर शिवणकामासाठी लागणाऱ्या दोऱ्याइतकाच राहील, असे पूर्वलक्षी प्रभावाने स्पष्ट करण्यात येईल.

स्थानिक संस्था कर.

१६. अध्यक्ष महोदय, स्थानिक संस्था कर रद्द करणे ही राज्य शासनाची भूमिका आहे. हा कर रद्द केल्यास मुंबई व्यतिरिक्त महानगरपालिकांना नुकसानभरपाईपोटी रु.६८७५ कोटी इतकी रक्कम द्यावी लागणार आहे. ही नुकसान भरपाई मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत कराचे दर वाढवून करण्याचे ठरविण्यात आले आहे. वाढीव मूल्यवर्धित

कराचा दर संपूर्ण राज्यात लागू होईल. यामुळे सध्या स्थानिक संस्था कर लागू नसलेल्या क्षेत्रासही वाढीव कर संकलनाचा हिस्सा द्यावा लागेल याचा विचार करुन नुकसान भरपाई देण्यासाठी किती कर वाढविणे आवश्यक आहे (Revenue Neutral Rate) याबद्दल शिफारस करण्यात आली आहे.

मुंबईतून क्रुड ऑईलवर लावण्यात येणाऱ्या जकातीपोटी मोठी रक्कम मुंबई महानगरपालिकेला प्राप्त होते. ही रक्कम State Specific Duty च्या माध्यमातून तेल कंपन्या संपूर्ण राज्यातील जनतेकडून वसुल करतात. याबाबत सुध्दा विचार होणे गरजेचे आहे.

मूल्यवर्धित कराच्या वाढीव करदराबाबत व्यापक विचारविमर्श होणे आवश्यक आहे. स्थानिक संस्था कर दिनांक १ ऑगस्ट २०१५ पासून रद्द करण्यात येईल.

वाढीव कर दरामुळे प्राप्त होणाऱ्या महसूलापैकी आवश्यक निधी महानगरपालिकांना अभिहस्तांकित केला जाईल व आवश्यकतेनुसार इतर क्षेत्रास द्यावयाच्या अनुदानासाठी मागणी सादर केली जाईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या कर प्रस्तावाद्वारे सुमारे रुपये सहाशे त्रेचाळीस कोटींचा अतिरिक्त महसूल प्राप्त होईल असा अंदाज आहे. सदर वाढ ही सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अंतर्भूत केली आहे. या प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल असा माझा विश्वास आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**